## जाहीर नोटीस (१)

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट – १)मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी मुळशी , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे वाकड येथील स.नं. १८१/२ पैकी व १८१/३ पैकी मधील श्री. जनार्दन गेणु तेली यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजुर विकास योजनेतील दोन २४.०० मी. रस्ता या प्रस्तावाने बाधित क्षेत्र ७४०.२४ चौ.मी जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे -

चतु:सिमा : -

१) २४.०० मी. रस्ता बाधित क्षेत्र – ५१४.३७ चौ.मी. (पिंक सिटी रस्ता)

पुर्वेस- लागु रस्ता
पश्चिमेस- अर्जदाराची उर्वरीत मिळकत
दक्षिणेस- लागु रस्ता (स.नं. १८१ पैकी)
उत्तरेस- लागु रस्ता (स.नं. १८१ पैकी)

२) २४.०० मी. रस्ता बाधित क्षेत्र – १९८. ८७ चौ.मी. (वाकड-थेरगाव रस्ता)

पुर्वेस- अर्जदाराची उर्वरीत मिळकत
पश्चिमेस- लागु रस्ता
दक्षिणेस- लागु रस्ता (स.नं. १८१ पैकी)
उत्तरेस- लागु रस्ता (स.नं. १८१ पैकी)

परिशिष्ट – २)मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे किवळे येथील स.नं.७३/१/१/२/३ पै. मधील श्री. सचिन रामदास तरस यांच्या मिळकती मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील आ.क्र. ४/११९ आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे (EWS) या प्रस्तावाने बाधित होणारे ३८१.३३ चौ.मी., जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे-

**उत्तरेस :- स.नं. ७३ पै. मिळकत**

**पुर्वेस :- स.नं. ७३ पै. मिळकत**

**दक्षिणेस :- स.नं. ७३ पै. मिळकत**

**पश्चिमेस :- स.नं. ७३ पै. मिळकत**

परिशिष्ट – ३)मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे किवळे येथील स.नं. ८३/२अ/१ पै. मधील मे. वैष्णवी प्रमोटर्स अँन्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. संदिप विठ्ठल काटे, श्री. संतोष विठ्ठल काटे व श्री. निलेश विठ्ठल काटे मे. सरस्वती डेव्हलपर्स तर्फे भागीदार सौ. मृणालीनी युवराज निंबाळकर यांच्या मिळकती मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील आ.क्र.४/१४२ टाऊन हॉल या प्रस्तावाने बाधीत होणारे ८८७.५० चौ.मी. व आ.क्र.४/१४१ खेळाचे मैदान या प्रस्तावाने बाधीत होणारे २५२.०० चौ.मी. असे एकुण ११३९.५० चौ.मी., जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे-

१) आ.क्र.४/१४२ टाऊन हॉल (बाधीत क्षेत्र- ८३०.५० चौ.मी.)

पुर्वेस :- स.नं. ८३ पैकीची मिळकत

पश्चिमेस :- महापालिकेच्या ताब्यातील मिळकत (रस्ता)

दक्षिणेस :- स.नं. ८३ पैकीची मिळकत

उत्तरेस :- स.नं. ८३ पैकीची मिळकत

२) आ.क्र.४/१४२ टाऊन हॉल व आ.क्र.४/१४१ खेळाचे मैदान (बाधीत क्षेत्र- ३०९.०० चौ.मी.)

पुर्वेस :- स.नं. ८३ पैकीची मिळकत

पश्चिमेस :- स.नं. ८३ पैकीची मिळकत

दक्षिणेस :- महापालिकेच्या ताब्यातील मिळकत (रस्ता)

उत्तरेस :- स.नं. ८३ पैकीची मिळकत

परिशिष्ट – ४)मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपळे गुरव येथील स.नं. ७८/२/१/२ पैकी मधील श्री. संतोष महादेव भिंताडे यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील १८.०० मी. रूंद रस्त्याने बाधित होणारे १५४.०० चौ.मी जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे -

**उत्तरेस- स.नं. ७८ पैकीची मिळकत**

**दक्षिणेस- स.नं. ७८ पैकीची मिळकत**

**पुर्वेस- स.नं. ७८ पैकी मधील अस्तित्वातील रस्ता**

**पश्चिमेस- स.नं. ७८ पैकीची मिळकत**

जाहिर नोटीस(२)

सर्व संबधीतांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत असुन सदर मिळकतीचे मालक यांच्याकडून एफ.एस.आय. उर्वरित भूखंडावर वापरण्याचे बदल्यात पिंपरी चिंचवड महानगरपालिका ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा जमीन मालकांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त मिळकतीवर वरील जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र , गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबध असल्यास संबधितांने प्रस्तूतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे - ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरुपात दयावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबध नाही असे समजून किंवा असल्यास संबधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमीनीचा मोबदला एफ.एस.आय. उर्वरित भूखंडावर वापरण्याच्या स्वरुपात वरील जमीन मालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट - मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी - मुळशी , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे वाकड येथील स.नं. १०८/३/२/ई पै. व स.नं. १०८/३/१/व पै. मधील सौ. शुभांगी दत्तात्रय माने व श्री. दत्तात्रय रामचंद्र माने यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील ३०.०० मी. रस्तारुंदीने बाधित क्षेत्र ३२४.५८ चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे -

पुर्वेस- स.नं. १०८ पैकीची मिळकत

पश्चिमेस- स.नं. १०८ पैकीची मिळकत

दक्षिणेस- स.नं. १०८ पैकी अर्जदाराची उर्वरित मिळकत

उत्तरेस - स.नं. १०८ पैकीची मिळकत

(राजेंद्र पवार)
उपसंचालक,
नगररचना व विकास विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११०१८

जाहिरात क्र. ७९४
दि. २५/१/२०२१

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे